पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १६७ व्या ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. १९ जानेवारी, २०२४ दुपारी ०३:४० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १६१ वी (तातडीची) बैठक **शुक्रवार, दि. १९ जानेवारी, २०२४ रोजी दुपारी ०३:४० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | ऑनलाईन उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. मलिक सगाजी रोकडे, प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०१] | **प्रस्तुत विद्यापीठ व भारतीय नाट्य परिषद मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाट्य संमेलनाच्या विविध खर्चासाठी रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) तरतूद करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: सोलापुरात होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलन (विभागीय) हे दि.२६, २७, २८ जानेवारी, २०२४ रोजी होत असून, त्याच्यापूर्वी त्या उपलक्ष २१ ते २६ जानेवारी, २०२४ या कालावधीत अनेक स्थानिक, युवा कलाकारांचे कार्यक्रम तसेच ग्रंथ दिंडी इ. उपक्रम होत आहेत. हे सर्व उपक्रम या संमेलनाचे स्वागताध्यक्ष माननीय चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सोलापूर जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, सोलापूर शहर तथा जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये उस्फुर्त सहभागी होत आहेत. सदर संमेलनाचे आयोजन प्रस्तूत विद्यापीठ व अखिल भारतीय नाट्य परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. सदर संमेलनासाठी लागणारा खर्च हा विद्यापीठाकडून करावा लागणार असल्यामुळे तरी संमेलन आयोजनाच्या अनुषंगाने लागणाऱ्या विविध खर्चासाठी रु.५,००,०००/- इतक्या रक्कमेची आवश्यकता असून खर्चास मान्यता दिल्यास खर्चासाठी वाढीव तरतुद Foundation Day and other function या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली करण्याची बाब विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **१०० वे नाट्यसंमेलनामध्ये युवोन्मेष हा कार्यक्रम प्रस्तुत विद्यापीठ व नाट्य संमेलन आयोजक यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. या नाट्य संमेलनाच्या वरील नमूद केलेल्या कार्यक्रमाच्या व इतर कार्यक्रमावरील खर्चासाठी रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) पर्यंतचा खर्च हा विद्यापीठ नियमानुसार करणेसाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**<br>**१. डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु - अध्यक्ष**<br>**२. डॉ. सुशिल कुमार शिंदे - सदस्य**<br>**३. डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड - सदस्य**<br>**४. श्री. सचिन मारुती गायकवाड - सदस्य**<br>**५. डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे - सदस्य सचिव**<br>**त्याचप्रमाणे संमेलनाच्या रु.५,००,०००/- या खर्चासाठी मंजूरी दिल्याने सदर रकमेची वाढीव तरतूद Foundation day & other Functions या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली करणेस मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

२५/१/२४
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद